# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक ५ वा
६ जुलै १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे

## देवाच्या दरबारात....

२३-३-१९२२ च्या 'यंग इंडिया'मध्ये महात्मा गांधीजींनी लिहिले होते,

**'भारतातील अर्धपोटी जनता हळूहळू मरणासन्न अवस्थेकडे कशी जात आहे याची शहरवासियांना बिलकुल कल्पना नाही. त्यांना हेही कळत नाही की त्यांना ज्या काही किरकोळ सोयीसवलती मिळतात त्या म्हणजे परकीय शोषकाला त्याच्या कामात हातभार लावल्याबद्दल दलाली आहे; ही दलाली आणि नफा जनतेला पिळून तयार झालेला आहे. ते हेही लक्षात घेत नाहीत की ब्रिटिश इंडियामध्ये कायद्याने स्थापन झालेले सरकार भारतीय जनतेच्या लुटीसाठीच चालते आहे. खेडोपाडी दिसणाऱ्या जिवंत सांगाड्यांच्या रूपाने उघड्या डोळ्यांनी दिसणाऱ्या पुराव्याचे कोणत्याही हिकमतीने किंवा आकड्यांच्या गफलतीने खंडन करता येणार नाही. काहीही असले तरी, इंग्लंड राष्ट्र आणि इंडियातील शहरवासियांना त्यांच्या या, इतिहासात कदाचित् अद्वितीय अशा गुन्ह्याचा झाडा – जर वर देव असलाच तर – देवासमोर एक ना एक दिवस द्यावा लागेल, याची मला पक्की खात्री आहे."**

## बड्या कारखानदारांकडील बँकांची थकबाकी सदतीस हजार कोटी

विजय मल्या, कानोरिअर, मोदी, शॉ वॉलेस, वालचंद यांसह अनेक बड्या उद्योगपती आणि उद्योगसमूहांकडे राष्ट्रीकृत बँकांची ३७,००० (सदतीस हजार) कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा गौप्यस्फोट अखिल भारतीय बँक अधिकारी महासंघाने केला आहे. या महासंघाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार एक कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमा कर्जाऊ घेतलेल्यांकडील थकबाकी १७,००० कोटी रुपयांची तर १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जदारांची एकूण थकबाकी १०,००० कोटी रुपये आहे.

उद्योगपती व उद्योगसमूहांखेरीज या कर्ज थकविणारांमध्ये काही मंत्री आणि पुढाऱ्यांचाही उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे.

राष्ट्रीकृत बँकांना सध्या होत असलेल्या प्रचंड तोट्याची कारणमीमांसा करण्यासाठी बँक अधिकारी महासंघाने हा अहवाल सादर केला आहे. त्यात थकित कर्जाबरोबरच सरकारी नियंत्रणांचाही उल्लेख केला आहे. या अहवालाचे वृत्त Major Industrial Houses figure in Bank's NPA List या शीर्षकाखाली 'Times of India' च्या २६ जून १९९५ च्या अंकात प्रकाशित झाले आहे.

राष्ट्रीकृत बँकांच्या प्रदीर्घ कालावधीत, भरपूर पगार घेणाऱ्या बँक अधिकाऱ्यांना आजच ही बुद्धी का सुचली? सरकारी नियंत्रणे पूर्वीपासूनच आहेत. उद्योगपती आणि उद्योग समूहांकडील थकबाकीही काही आजच तयार झाली नसणार. खुल्या व्यवस्थेत खाजगी बँकांशी स्पर्धा करावी लागणार असे जवळजवळ निश्चित झाल्यामुळे 'नाक दाबले' गेले म्हणून तर 'तोंड उघडले' असे नाही ना?

काही असो. गेली ४५ वर्षे मनमुरादपणे सरकारी संरक्षणाचा लाभ घेतलेली कारखानदारीही कर्जबाजारी आहे हे तर उघड झाले! सर्व तऱ्हेची अनुदाने मिळूनही कारखानदारी कर्जबाजारी आहे आणि थकबाकी थोडी थोडकी नव्हे, पुरी ३७,००० कोटी रुपये!

१९९१ साली संपूर्ण देशातील शेतकऱ्यांकडील सर्व बँकांची मिळून थकबाकी १४,००० कोटी रुपयांची होती. त्यावेळी केंद्रात निवडून आलेल्या राष्ट्रीय आघाडीच्या सरकारने शेतकरी आंदोलनाच्या दबावामुळे सुमारे ४,००० कोटी रुपये शेतकऱ्यांना माफ केले. तेव्हा 'देशाची अर्थव्यवस्था बुडणार', 'देश भिकेला लागणार' असं म्हणून सर्व अर्थशास्त्र्यांनी आणि त्यावेळी विरोधात असलेल्या काँग्रेसवाल्यांनी टाहो फोडला होता. अगदी सत्तारूढ राष्ट्रीय आघाडीतीलही काही नेते या निर्णयावर नाराज होते. कर्जमुक्तीचे आंदोलन लढणारे शेतकरीही या भीकसदृश कर्जमाफीने फारसे सुखावले नव्हते; 'चोराच्या हातची लंगोटी' इतपतच त्यांनी समाधान मानले होते. देश स्वतंत्र झाल्यापासून शेतकऱ्यांवरील कर्ज वाढतच चालले होते.

| वर्ष | शेतकऱ्यांवरील एकूण थकित कर्ज (कोटी रुपये) |
|---|---|
| १९६१ | १,९५४ |
| १९७१ | ३,८४८ |
| १९८१ | ६,१९३ |
| १९९१ | १४,००० |

१९९०-९१ साली झालेली कर्जमाफी आणि कर्जाच्या वाढीचा वेग लक्षात घेता सध्या हे कर्ज पुन्हा चौदा पंधरा हजार कोटीपर्यंतच पोहोचले असेल.

१९९०-९१ साली कर्जमाफी घेतांनाही, घामाचं दाम मिळत नसल्याची जाणीव झालेल्या शेतकऱ्यांना तसं कमीपणाचंच वाटत होतं. पण परिस्थितीवर इलाज नव्हता.

दोन वर्षांपूर्वी इंडिया सरकारने गॅट करारात सहभागी होतांना स्वच्छ कबुलीजबाब दिला की आम्ही शेतीमालाच्या किंमती कमी ठेवून शेतकऱ्यांना दर वर्षी २४,००० कोटी रुपये कमी देतो. पण, अजूनही ही लूट थांबविण्याची प्रक्रिया सुरू होत नाही.

'शेतकऱ्याचं मरण हेच सरकारचं धोरण' यावरून १९७९-८० साली चोर सापडला, १९९२-९३ मध्ये या चोराने चोरीचा कबुलीजबाब दिला. आणि तरीही चोर अजून चोरी करतच राहाणार असेल तर आता दोष चोराचा नाही, मालधन्याचा असेल.

सतत अनुदानांचा म्हणजे अधिक सबसिडीचा आणि वेगवेगळ्या सोयीसवलतींचा लाभ घेणाऱ्या कारखानदारीकडील ३७,००० कोटी रुपयांची थकबाकी आणि दरवर्षी २४,००० कोटी रुपयांनी लुटल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांकडील १४,००० कोटी रुपयांची थकबाकी याचा हिशोब कोणी लावणार आहे का? ●

# शरद जोशींच्या अर्थशास्त्रात तथ्य आहे

**एस्. शंकर मेनन, नाबार्ड अधिकारी**

चारआठ दिवसांपूर्वी नाबार्डचे एक अधिकारी श्री. एस्. शंकर मेनन आंबेठाण येथील अंगारमळ्यात श्री. शरद जोशींना भेटायला आले होते. चर्चेचा विषय अर्थातच शेतकऱ्यांकडील थकित कर्जाचा होता. शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या कर्जमुक्ती आंदोलनाची भूमिका, सरकारी शेतीच्या लुटीची नीती, त्या अनुषंगाने शेतकऱ्यांवर लादल्या जाणाऱ्या कर्जांची अनैतिकता इत्यादी विषय त्यांच्यासमोर विस्ताराने मांडले. आता जगजाहिर झालेल्या शेतकऱ्यांना २४,००० कोटी रुपयांच्या लुटीच्या पार्श्वभूमीवर कोणीही शेतकरी केवळ शेतीवर जगूच शकत नाही असेही शरद जोशींनी त्यांना सांगितले.

श्री. एस्. शंकर मेन यांनी ही भेट आटोपून परत गेल्या गेल्या मुंबईच्या मिड्-डे या दैनिकाच्या ४ जुलै १९९५ च्या अंकात एक लेख लिहून या भेटीचा वृत्तांत दिला आहे. त्याच्या शेवटी लिहिले आहे, "भेट आटोपून परत जातांना माझ्या लक्षात आलं की शरद जोशींनी त्यांचे शेतीविषयक अर्थशास्त्र सांगितलं आणि त्यात बरंच तथ्य आहे."

'येत्या सप्टेंबरमध्ये तुमच्या (बँक क्षेत्राच्या) विरुद्ध आमचा संघर्ष पुन्हा सुरू होईल' असे शरद जोशींनी श्री. मेनन यांना या भेटीत सांगितले आहे, पाहू या मेननसाहेब त्या संघर्षाला कसे सामोरे येतात ते. ●

# निर्यातीवरील सर्व बंधने उठवावीत

**कृषिअर्थतज्ज्ञ**

सरकारने शेतीमालाच्या निर्यातीवरील झाडून सर्व निर्बंध त्वरीत दूर करावेत, अगदी अन्नधान्यावरीलही निर्यातबंदी दूर करावी; तसेच, शेतीसाठी लागणारे तंत्रज्ञान, खते, सिंचन, दळणवळण वगैरे संरचना, कर्ज यांचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणांमध्ये ठोस सुधार घडवून आणावेत अशी शिफारस दोन अर्थशास्त्रज्ञांनी केली आहे. त्यातील एक आहेत डॉ. अशोक गुलाटी आणि दुसरे डॉ. सी. एच्. हनुमंतराव!

आतापर्यंत सी. हनुमंतराव शेतकऱ्यांबद्दल फारसं चांगलं कधी बोलत नसत. १९९१ साली राष्ट्रीय मोर्चाच्या सरकारने स्थापन केलेल्या कृषिसल्लागार समितीच्या 'राष्ट्रीय कृषि धोरणा'च्या मसुद्यातील अनेक मुद्द्यांना त्यांनी कठोर विरोध केला होता.

आता ते शेतकऱ्यांच्या बाजूने बोलू लागले आहेत. येत असलेल्या 'बळिराज्या'ची ही किमया तर नव्हे? ●

# कृषि अर्थ प्रबोधिनी प्रशिक्षण अभ्यासक्रमाची आखणी

अंगारमळ्यातील कृषि अर्थ प्रबोधिनीतील प्रशिक्षण शिबिरे पुन्हा सुरू करण्याचा निर्णय शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या संयुक्त कार्यकारिणीने ३/४ जून १९९५ रोजी आंबेठाण येथे झालेल्या बैठकीत घेतला. या बैठकीत ठरल्याप्रमाणे, प्रशिक्षण शिबीरांचा अभ्यासक्रम व प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन यासंबंधी आखणी करण्यासाठी १८, १९, २० जून १९९५ रोजी आंबेठाण येथे एक प्राथमिक चर्चाशिबीर आयोजित करण्यात आले होते. या चर्चाशिबिरास सर्वश्री शरद जोशी, शंकर धोंडगे, किशोर माथनकर, सौ. सुमनताई अग्रवाल, ॲड. मोरेश्वर टेमुर्डे, ॲड. वामनराव चटप, सौ. शैलजा देशपांडे, सौ. सुमनताई गुटे (बढे), डॉ. श्याम अष्टेकर, ॲड. अनंत उमरीकर, अनिल धनवट, पांडुरंग भालशंकर, दत्ता पवार, लक्ष्मीकांत देशमुख, अजित नरदे, श्याम पवार, अच्युत गंगणे, डॉ. मानवेंद्र काचोळे, अमर हबीब, वामनराव जाधव, प्रा. केशव देशपांडे, हेमंत देशमुख, शिवाजी गिरी, डॉ. वसंतराव बोंडे इत्यादि कार्यकर्ते हजर होते.

जगभर आकाराला येत असलेले खुल्या अर्थव्यवस्थेचे वातावरण, देशातील राजकीय व सामाजिक परिस्थिती तसेच दळणवळण व प्रसारमाध्यमांच्या साधनांमधील वेगाने पुढे जाणारे तंत्रज्ञान यांवर या चर्चाशिबिरात सांगोपांग चर्चा होऊन प्रशिक्षण शिबिरांच्या अभ्यासक्रमाबाबत विचार विनिमय करण्यात आला.

या चर्चेतून अभ्यासक्रमाचा एक कच्चा आराखडा तयार करण्यात आला. त्यातील ठळक विषय पुढीलप्रमाणे –

**१. नेहरूव्यवस्था यशस्वी का झाली नाही?**

या विषयामध्ये नेहरूव्यवस्थेचे दुष्परिणाम, भांडवलनिर्मिती आणि शेतीच्या लुटीची व्यवस्था यांचा अभ्यास अभिप्रेत आहे.

**२. १९९० नंतर उदयास येत असलेले**

**आर्थिक युग**

जागतिक संदर्भात अर्थव्यवस्थेतील बदल, त्याबाबतीत काँग्रेसची भूमिका – वाढता भीकवाद,

डंकेल, प्रस्ताव, सबसिडी, ऋणात्मक सबसिडी, छुपी (अप्रत्यक्ष) सबसिडी, गॅट कराराचे स्वरूप, कराराच्या विरोधकांची भूमिका

उद्योजक संस्कृतीचा सिद्धांत, अ-सरकारीकरण, स्पर्धा व कार्यक्षमता यांचे महत्त्व

खुल्या व्यवस्थेकडील संक्रमण काळातील कार्यक्रम – स्वतंत्र भारत पक्षाचा ३० कलमी कार्यक्रम, कायदा-सुव्यवस्था व बहुकेंद्रित समाज.

नवा दृष्टिकोन, नव्या दृष्टिकोनातून इतिहास, साहित्य, कला, धर्मादाय कार्यक्रम इत्यादि.

**३. अर्थव्यवहार**

कंपनीची उभारणी, शेअरबाजार, प्रकल्प अहवाल; व्यापार, निर्यात, वित्तव्यवहार व हिशोब.

**४. विविध विचारसरणी**

स्वातंत्र्याचा अर्थ आणि त्यादृष्टीने मार्क्सवाद, गांधीवाद आदि विविध विचारसरणींचा तुलनात्मक अभ्यास.

**५. उत्क्रांती**

उत्क्रांतीच्या दिशा, स्वातंत्र्याच्या व ज्ञानाच्या कक्षा, संस्कृतीचा इतिहास

**६. संरचना**

आधुनिक दळणवळण व प्रसारमाध्यमांचा परिचय

**७. संघटनात्मक बांधणी**

आजच्या परिस्थितीत अनिवार्य असलेल्या या विषयांना सामावून घेणाऱ्या अभ्यासक्रमाचा आवाका पाहाता या अभ्यासक्रमाची विभागणी करून दोन किंवा तीन प्रकारची प्रशिक्षण शिबिरे घेणे, काही शिबिरात शेतकरी संघटनेबाहेरील अभ्यासकांना प्रशिक्षणार्थी म्हणून प्रवेश देणे, शिबिरांच्या आयोजनाच्या खर्चाची तरतूद म्हणून प्रशिक्षणशुल्काची आकारणी करणे इत्यादी बाबींवर विचार करून निर्णय घेण्यासाठी डॉ. काचोळे, अजित नरदे, अमर हबीब, किशोर माथनकर, प्रा. केशव देशपांडे, डॉ. श्याम अष्टेकर यांची एक समिती नियुक्त करण्यात आली. समितीचे कामकाज लगेच सुरू झाले असून या समितीची पुढील बैठक दिनांक ७ जुलै १९९५ रोजी औरंगाबाद येथे होणार आहे. प्रशिक्षण शिबिरांचा कार्यक्रम निश्चित ठरल्यानंतर त्यासंबंधीची माहिती शेतकरी संघटक व अन्य वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केली जाईल. ●

शेतकरी महिला आघाडी

# नवनिर्वाचित अध्यक्षांचा प्राथमिक दौरा

शेतकरी संघटना

शेतकरी संघटने अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे आणि शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. इंदिराबाई पाटील यांचा महाराष्ट्रव्यापी संयुक्त दौरा पुढील वेळापत्रकाप्रमाणे होईल. या दौऱ्यात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी त्या जिल्हाभरातील सर्व स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांची बैठक होऊन तेथे जिल्ह्यातील शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडी यांची संघटनात्मक पुनर्बांधणी करण्यात येईल. या दौऱ्यानंतर शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणींची घोषणा करण्यात येईल. तसेच, पुढील कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणीच्या दृष्टीने, आवश्यक तेथे शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखांच्या फेरनेमणुका करण्यात येतील.

या दौऱ्याचा जिल्हावार दिनक्रम पुढीलप्रमाणे असेल –

| | |
|---|---|
| २५ जुलै | बीड |
| २६ जुलै | लातूर |
| २७ जुलै | उस्मानाबाद |
| २८ जुलै | सोलापूर |
| २९ जुलै | सांगली (सातारासह) |
| ३० जुलै | कोल्हापूर |
| ३१ जुलै | पुणे |
| १ ऑगस्ट | नगर |
| २ ऑगस्ट | नाशिक |
| ३ ऑगस्ट | धुळे |
| ४ ऑगस्ट | जळगाव |
| ५ ऑगस्ट | औरंगाबाद |
| ६ व ७ ऑगस्ट | सुट्टी |
| ८ ऑगस्ट | बुलढाणा |
| ९ ऑगस्ट | अकोला |
| १० ऑगस्ट | अमरावती |
| ११ ऑगस्ट | वर्धा |
| १२ ऑगस्ट | नागपूर |
| १३ ऑगस्ट | भंडारा |
| १४ ऑगस्ट | गडचिरोली |
| १५ ऑगस्ट | चंद्रपूर |
| १६ ऑगस्ट | यवतमाळ |
| १७ ऑगस्ट | नांदेड |
| १८ ऑगस्ट | परभणी |
| १९ ऑगस्ट | जालना |

विद्यमान जिल्हाप्रमुखांनी आपल्या जिल्ह्यातील बैठकीचे निमंत्रण जिल्ह्यातील सर्व पुरुष व महिला कार्यकर्त्यांना पोहोचेल अशी व्यवस्था पत्र व वृत्तपत्राच्या साहाय्याने करावी, बैठकीचे स्थान आरक्षित करावे तसेच दौऱ्यात भाग घेणाऱ्या नेत्यांसाठी बैठकीचा आदला दिवस व बैठकीचा दिवस अशी दोन दिवसांच्या निवासासाठीही जागा आरक्षित करावी. या सर्व व्यवस्थेची माहिती दि. २० जुलै १९९५ च्या आत

श्री. बाबासाहेब देशमुख
शेतकरी संघटना विभागीय कार्यालय,
कलामंदिराशेजारी, नांदेड.
फोन : नांदेड : ०२४६२-३४३४९

या पत्त्यावर कळवावी.

कार्यकर्त्यांच्या बैठकीखेरीज विद्यार्थी मेळावा, महिला मेळावा, पत्रकार परिषद, जाहिर सभा, खुल्या अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्यांचे मित्र घटक यांची बैठक अशा प्रकारचा एखादा किंवा जास्त कार्यक्रम आयोजित करावयाचे असल्यास वरील पत्त्यावर संपर्क साधून तशी पूर्वपरवानगी घेऊन त्या कार्यक्रमांच्या वेळाही कळवाव्यात.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 11th July, 1995

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
July 6, 1995

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

महिला आघाडी

### माजी अध्यक्षांचे मनोगत

# सगळ्या आपापल्या परीने ककोमाला लागू या.

**सौ. सरोज ककोशीककेर, वर्धा**

शेतकरी महिला आघाडीचे अध्यक्षपद अडीच वर्ष माझ्याकडे होते. या काळात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या मायबहिणींशी, कधी व्यासपीठावरून तर कधी वैयक्तिक चर्चा करण्याची संधी मिळाली. या चर्चेत प्रत्येक स्त्रीला महिला आघाडी ही खरोखरच आम्हा ग्रामीण भगिनीचे अंतरंग जाणणारी वाटली; आमच्या अंतरंगावरील दुःखावर फुंकर टाकणारी वाटली, ही चांदवडची किमया आहे.

महिला आघाडीच्या चांदवड अधिवेशनांत जमलेल्या सर्व ग्रामीण भगिनी शेतकरी महिला म्हणून आपले प्रश्न मांडले जातात, एवढ्या मोठ्या व्यासपीठावर केवळ आपण रोज जगणाऱ्या जीवनातील शल्याची चर्चा होते, त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न होणार म्हणून त्यांच्या चेहऱ्यावर चमक दिसायला लागली.

पुढे अमरावती महिला अधिवेशन व औरंगाबाद आणि नागपूरचे संयुक्त अधिवेशन झाले. दरम्यानच्या काळात महिलांना पंचायतीवर निवडणूक लढण्याची संधी, पाण्याचा प्रश्न, मालमत्तेवर लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमामुळे अधिकार, संसाराची राखरांगोळी करणाऱ्या दारूच्या दुकानबंदीचा कार्यक्रम ह्या सर्व कार्यक्रमांमुळे महिला आघाडी आमची आहे अशी भावना त्यांच्यात निर्माण झाल्याचा अनुभव या अडीच वर्षात मी घेतला.

महिला आघाडीच्या या कार्यक्रमाव्यतिरिक्त सर्व महिलांना आर्थिक पायावर उभे राहण्याचा कार्यक्रम माजघर शेतीच्या माध्यमातून अंमलात आणण्याचा प्रत्येकीचा मानस आहे. माजघर शेतीचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम महिला आघाडीच्या माध्यमातून सुरू करण्यात यावा. या निमित्ताने सर्व भगिनींकडून विचार मागवावे, जेणेकरून ही कल्पना साकार होईल.

सरकारचे महिला धोरण, त्यांच्याकडून मिळणारी तुटपुंजी आर्थिक मदत आजही आपल्याला मिळेल काय या आशेने ग्रामीण भगिनी प्रत्येक राजकीय नेत्याकडे बघतांना व चौकशी करताना दिसतात. आपल्या पायावर उभे राहून या तुटपुंज्या मदतीशिवाय आम्ही आर्थिक बळकटी मिळवू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करणे आवश्यक आहे. 'दळभद्री चिंधी'ची सार्थकता या आत्मविश्वासात दिसून येणार असे वाटते.

या सर्व विषयांवर नवीन अध्यक्षा सौ. इंदिराताई पाटील यांच्या सोबत आम्हाला काम करावयाचे आहे. महिला आघाडीच्या प्रत्येक भगिनीचे विचार आम्हाला मार्गदर्शक ठरतील.

तेव्हा शेतकरी महिला आघाडीला अधिक बळकटपणे उभे करण्याकरिता आपण सगळ्या आपआपल्या परीने कामाला लागू या. नवीन अध्यक्षांच्या समवेत आपली ही वाटचाल संघटकमध्ये आपले विचार पाटवून, चर्चा करून, शिबीरांत सहभागी होवून यशस्वी ठरणार आहेत यात मला शंका नाही.

---

## प्रा. रमेश शिपूरकर यांचे दुःखद निधन

शेतकरी संघटनेची 'भीक नको, हवे घामाचे दाम' ही मूलगामी घोषणा नेमकी पकडणारे प्रा. रमेश शिपूरकर यांचे ३१ मे १९९५ रोजी सकाळी निपाणी येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.

शेतकरी संघटनेच्या निपाणी आंदोलनात (१४ मार्च ते ६ एप्रिल ८१) त्यांनी सर्व काळ भाग घेतला, त्या आंदोलनाच्या संयोजनात हिरिरीने भाग घेतला. त्यांच्या या सहभागाची पावती म्हणून ६ एप्रिल ८१ च्या पहाटे शरद जोशींच्याबरोबर त्यांनाही अटक करून बल्लारीच्या तुरुंगात नेण्यात आले. बल्लारीच्या तुरुंगात अटक सत्याग्रहींसमोर शरद जोशींची भाषणे, नंतर त्यावरील कार्यकर्त्यांच्या चर्चा या रूपाने प्रशिक्षण शिबिरच सुरू झाले. या भाषणांत विचारप्रक्रियेच्या ओघात शरद जोशींनी उच्चारलेले 'शेतकऱ्यांना भीक नको, घामाचे दाम पाहिजे' हे शेतकरी आंदोलनाचा उद्देश साररूपाने सांगणारे विधान प्रा. रमेश शिपूरकरांनी नेमके टिपले आणि त्याला घोषणेचे वजन प्राप्त झाले. प्रा. रमेश शिपूरकर व प्रा. सुभाष जोशी यांनी शरद जोशींची बल्लारी तुरुंगातील भाषणे संपादित केली. हीच भाषणे शेतकरी प्रकाशनने 'भीक नको, हवे घामाचे दाम' या शीर्षकाच्या पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित केली. प्रा. शिपूरकर देहाने जरी आपल्यातून दूर झाले असले तरी या घोषणेच्या सानिध्याने आपल्या सोबत सततच राहाणार आहेत.

प्रा. शिपूरकरांनी आपला प्राध्यापकी पेशा सांभाळत अनेक सामाजिक चळवळींत भाग घेतला, तसेच बातमीदार म्हणूनही यशस्वीपणे काम केले.

शेतकरी संघटना व शेतकरी संघटक परिवार प्रा. रमेश शिपूरकरांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी. - ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**